नियमीत फौ. केस. क्रमांक ३/२०१० मधील नि.क्र.१ वरील आदेश

(सरकार वि आनंदा आडके वगैरे )

१. प्रस्तुत केस मधील आरोपी क्रमांक १ ते ४ यांचेवर भारतीय दंड संहिता कलम ४५४, ३८० सह ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपी गैरहजर असल्यामुळे त्यांना अजामीनपात्र वॉरंट काढले. जामीनदाराना नोटीसा काढण्यात आल्या. त्यानंतर वेळोवेळी अजामीनपात्र वॉरंट काढून देखील व सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येवून देखील काही उपयोग झालेला नाही. त्यानंतर सर्व आरोपींविरुध्द जाहीरनामा काढण्यात आला. सदरील प्रकरण हे ७ वर्षे इतके जुने आहे. अशा परिस्थितीत सर्व प्रयत्न करुन देखील आरोपींना वॉरंटची बजावणी होत नसल्यामुळे सदरची केस दैनंदिन बोर्डावर ठेवणे उचीत होणार नाही. सबब आरोपी क्रमांक १ ते ४ यांचा थांगपत्ता लागत नसल्यामुळे सदरची केस ही डॉरमंट फाईलला ठेवण्यात यावी. तसेच आरोपी क्रमांक १ ते ४ यांचेविरुध्द स्टँडींग वॉरंट काढण्यात यावे.

सही/-

दिनांक २८/०४/२०१७

(अभय अ. मेहेंदळे)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, विटा